रयत शिक्षण संस्था,सातारा
आस्थापना विभाग
जा.नं. आस्था. १२०८
दि. 3 0 MAY 2024

**सर्व शाखाप्रमुख,**
**मध्य, दक्षिण, पश्चिम व रायगड विभागातील सर्व शाखा,**
**(माध्यमिक, उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालयीन विभाग)**
**रयत शिक्षण संस्था,**

यांना . . . .

**विषय - विभागीय अधिकारी / सहाय्यक विभागीय अधिकारी या पदाच्या नियुक्तीसाठी अर्ज करणेबाबत.**

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या दि.१०/०९/२०२३ रोजी भरलेल्या बैठकीतील ठराव नं. ०७ ने विभागीय अधिकारी यांची निवड सद्या कार्यरत असलेल्या कार्यक्षम, संस्थानिष्ठ, होतकरू, शारीरिकदृष्ट्या सक्षम व किमान दोन वर्षे सेवा बाकी असलेल्या मुख्याध्यापकांमधून करण्यात यावी तसेच सहाय्यक विभागीय अधिकारी यांची निवड माध्यमिक विभागाकडे सद्या कार्यरत असलेल्या कार्यक्षम, संस्थानिष्ठ, होतकरू, शारीरिकदृष्ट्या सक्षम व किमान दोन वर्षे सेवा बाकी असलेल्या मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, ज्युनिअर कॉलेजकडील उपप्राचार्य व पर्यवेक्षक यांच्यातून करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

एखाद्या सेवकास विभागीय अधिकारी व सहाय्यक विभागीय अधिकारी या दोन पदासाठी अर्ज करावयाचे असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा.

मध्य व दक्षिण विभागातील सध्या असणा-या पात्र सहाय्यक विभागीय अधिकारी यांनी विभागीय अधिकारी पदासाठी अर्ज केल्यास निवड समितीने त्यांची विभागीय अधिकारी पदासाठी निवड केली तर त्यामुळे रिक्त होणा-या सहाय्यक विभागीय अधिकारी पदी सध्या आलेल्या विभागीय अधिकारी पदासाठीच्या अर्जातून सेवकाची सहमती असेल तर सहाय्यक विभागीय अधिकारी या पदी निवड समितीमार्फत निवड करण्यात येईल.

वरील ठरावानुसार चार विभागीय अधिकारी (मध्य विभाग - १, दक्षिण विभाग -१, पश्चिम विभाग -१, व रायगड विभाग- १) व दोन सहाय्यक विभागीय अधिकारी (पश्चिम विभाग -१ व रायगड विभाग- १) अशा एकूण ०६ जागा दि. ३०/०६/२०२४ रोजी रिक्त होणार असल्यामुळे सदरच्या रिक्त जागा भरावयाच्या आहेत, त्यासाठी आपल्या शाखेतील कार्यरत सेवकांमधून अर्ज भरण्याच्या अंतिम तारखेस म्हणजेच दि. ११/०६/२०२४ रोजी किमान दोन वर्षे सेवा बाकी असलेल्या पात्र सेवकांकडून सोबत जोडलेल्या नमुन्यात दि. ११/०६/२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत अर्ज मागविणेत येत आहेत. सदरचे परिपत्रक व अर्जाची झेरॉक्स प्रत संबंधित सेवकांना देवून त्यांची पोहोच घेवून आपल्या दप्तरी ठेवावी. सदरचे पत्र व अर्ज संस्थेच्या www.rayatshikshan.edu या वेबसाईटवर उपब्लध आहे.

**सचिव**
**रयत शिक्षण संस्था,सातारा**

**सोबत - अर्ज**

प्रत माहितीसाठी रवाना . . .
१) मा.चेअरमन, रयत शिक्षण संस्था,सातारा
२) मा.व्हा.चेअरमन, रयत शिक्षण संस्था,सातारा
३) विभागीय चेअरमन, रयत शिक्षण संस्था, मध्य विभाग, सातारा, दक्षिण विभाग, सांगली, पश्चिम विभाग,पुणे व रायगड विभाग,कामोठे (पनवेल)
४) सहसचिव (उच्च शिक्षण/माध्यमिक / ऑडिट), रयत शिक्षण संस्था,सातारा
५) विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, मध्य विभाग, सातारा, दक्षिण विभाग, सांगली, पश्चिम विभाग,पुणे व रायगड विभाग,कामोठे (पनवेल)

# रयत शिक्षण संस्था, सातारा

## विभागीय अधिकारी / सहाय्यक विभागीय अधिकारी पदासाठी अर्ज

पासपोर्ट साईज फोटो लावावा व त्यावर आपली स्वाक्षरी करावी

**मा.सचिव,**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**

**यांना .....**

**विषय - विभागीय अधिकारी / सहाय्यक विभागीय अधिकारी करुन घेणेबाबत.**

महाशय,

मी, श्री. ---------------------------------------------------------- रयत शिक्षण संस्थेच्या ----- विभागासाठी विभागीय अधिकारी / सहाय्यक विभागीय अधिकारी म्हणून काम करु इच्छितो. संस्थेची सर्व ध्येय धोरणे मला मान्य असून संस्थेने आतापर्यंत केलेले व यापुढे केल्या जाणा-या सर्व नियमांचे पालन करण्यास मी तयार आहे.

संस्था सांगेल ते काम, सांगेल त्या ठिकाणी जाऊन काम करण्याची माझी तयारी आहे. संस्थेच्या परवानगीशिवाय आर्थिक लाभ होणारे कोणतेही काम वा व्यवसाय मी करणार नाही.

**माझ्या संबंधीची व्यक्तिगत माहिती खालीलप्रमाणे -**

**अ) व्यक्तिगत माहिती -**

०१) संपूर्ण नाव - ---------------------------------------------

०२) राहण्याचे मूळ गाव व पत्ता - ---------------------------------------------

---------------------------------------------

संपर्कासाठी मोबाईल/दूरध्वनी क्रमांक -----------------------------------------------------------

ई-मेल आयडी. ---------------------------------------------------------------

०३) जन्मतारीख - (अंकी) (अक्षरी) -----------------------------------------------

**(प्रस्तावासोबत सेवापुस्तकातील जन्मतारीख नोंद असलेल्या पानाची खरी नक्कल प्रत जोडावी.)**

०४) संस्था नेमणूक तारीख : / / सेवानिवृत्ती तारीख : / /

०५) वय- दि. ११/०६/२०२४ रोजीचे वय पूर्ण वर्ष : ______ महिने : _________ दिवस : ______

०६) धर्म व जात :

०७) शैक्षणिक पात्रता :

०८) सद्याची शाखा :

०९) सद्याचा हुद्दा :

१०) अनुभव (मुख्याध्यापक) : ------ वर्ष --------- महिने

११) एच.आर.एम.एस.नंबर (HRMS Employee Code):

**ब)**

०१) सेवकाचे अध्यापन कार्य -

माध्यमिक विभागाकडील मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व ज्युनिअर कॉलेजकडील उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक म्हणून काम केलेल्या शाखांचा तपशिल

| अ.नं. | शाखेचे नाव | हुद्दा | संस्थेतील नोकरीचा कालावधी | | नोकरीचा कालवधी वर्ष/महिने | शाखा अनुदानित/ विनाअनुदानित |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

०२) गेल्या पाच वर्षातील स्वत:चे अध्यापन कार्य -

एस.एस.सी. / एच.एस.सी. / शासकीय परीक्षा मंडळाचे शेकडा निकाल -

| अ.नं. | परीक्षेचे नाव / तपशिल | महिना/साल | विषय | शेकडा निकाल | एस.एस.सी./ एच.एस.सी./ शासकीय परीक्षा मंडळ शेकडा निकाल |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

०३) माध्यमिक विभागाकडील मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व ज्युनिअर कॉलेजकडील उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक म्हणून केलेल्या कामाचा शेवटच्या पाच वर्षातील संबंधीत शाखेच्या निकालाची माहिती -

| अ.नं. | परीक्षेचे नाव / तपशिल | महिना/साल | शेकडा निकाल | एस.एस.सी./ एच.एस.सी./ शासकीय परीक्षा मंडळ शेकडा निकाल |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

०४) एस.एस.सी./एच.एस.सी./शासकीय स्पर्धा परीक्षेतील सहभाग, अनुभव (वर्षे)

०१) प्राश्निक : ०२) परीक्षक : ०३) मॉडरेटर/चीफ मॉडरेटर :

०४) केंद्र संचालक :

०५) स्वत:च्या कारकिर्दीत स्वत:च्या मार्गदर्शनाखाली एस.एस.सी./एच.एस.सी. परीक्षेत गणुवत्ता यादीत आलेले विद्यार्थी -

०६) स्वत:च्या कारकिर्दीत स्वत:च्या मार्गदर्शनाखाली विभागीय/राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी सांघिक / वैयक्तिक पारितोषिके मिळविलेले विद्यार्थी -

०७) एस.एस.सी./एच.एस.सी. स्तरावर विविध अधिकार मंडळावर सदस्य म्हणून केलेले काम-
(एस.एस.सी. / एच.एस.सी. - बोर्ड मेंबर, पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ सदस्य, अभ्यास मंडळ सदस्य, इ.)

क) संस्थांतर्गत विद्यार्थी गुणवत्ता वाढ व शाखा विकासासाठी केलेले कार्य -

०१) विद्यार्थी गुणवत्ता वाढ प्रकल्पातील सहभाग -
(सराव परीक्षा, प्राश्निक, उन्हाळी वर्ग मार्गदर्शक, संचालक, विषयतज्ज्ञ, इ. म्हणून केलेले काम)

०२) अ- शिक्षक/शिक्षकेत्तर सेवक, मुख्याध्यापक, उद्बोधन वर्गामधील सहभाग / मार्गदर्शन-
(मार्गदर्शक/संचालक म्हणून केलेले काम)
ब- विविध चर्चासत्रातील विषयतज्ज्ञ किंवा केंद्रप्रमुख म्हणून सहभाग

०३) कर्मवीर विद्याप्रबोधिनी
अभ्यासक्रम मंडळ, रयत प्रज्ञा शोध परीक्षा, प्राश्निक, मॉडरेटर, लेखन, डिझायनर म्हणून सहभाग.

०४) शाखेच्या प्रगतीसाठी केलेले भरीव कार्य
(शाखेसाठी स्वत: मिळवून दिलेली देणगी, जमीन बक्षीसरुपाने मिळवून देणे, नवीन शाखा सुरु करणे, इ. मधील योगदान)

०५) इमारत बांधकाम/शेती - यामधील प्रमुख म्हणून सहभाग.

०६) संस्थांतर्गत / शाखांतर्गत व प्रशासकीय समितीवर सदस्य म्हणून केलेले काम.

०७) सांस्कृतिक, सामाजिक व राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमातील सहभाग.
(अंधश्रध्दा निर्मूलन, आरोग्य शिबीर, सामाजिक वनीकरण, प्रौढ साक्षरता अभियान, जनजागृती, लोकसंख्या शिक्षण, पर्यावरण, इ.)

०८) शैक्षणिक व सामाजिक सेवाभावी संघटनेतील सहभाग -

०१. संस्थेचे / संघटनेचे नाव व पद

०२. शैक्षणिक / सामाजिक संघटनेच्या माध्यमातून किंवा स्वतंत्रपणे केलेले लेखन / प्रकाशन, इ. (अध्ययन, अध्यापन पुस्तिका, क्रमिक पुस्तके, वाङ्:मयीन लेखन, पुस्तके, संदर्भ ग्रंथ, शोध निबंध, इ.)

०३. शैक्षणिक / सामाजिक संघटना - चर्चासत्र, उद्बोधन वर्ग, उजळणी वर्ग, कृतिसत्र यामधील मार्गदर्शक म्हणून सहभाग

०४. समाजसेवाभावी संस्थेतील / संघटनेतील सहभाग

०५. राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील झालेली चर्चासत्रे, परिसंवाद वा परिषदा यामधील सहभाग / त्यानिमित्ताने सादर केलेले शोध निबंध.

ड) वेळोवेळी संस्थेने निधी वा देणगी या संबंधाने केलेल्या आवाहनास आपण दिलेला प्रतिसाद / एकूण सेवाकालात मिळालेले गौरव, पुरस्कार, इ. चा तपशिल.

०१. हिरक महोत्सव निधी, कर्मवीर जन्मशताब्दी निधी, अमृत महोत्सव निधी, श्री छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस अमृत महोत्सव निधी, दुर्बल शाखा विकास निधी, कर्मवीर निधी, स्थानिक शाखा मदत निधी, सेवक वेल्फेअर फंड यामधील आपले योगदान.

०२. आपण लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शिक्षणोत्तेजक सहकारी पतपेढीचे सभासद आहात काय? कुटूंब कल्याणचे सभासद आहात काय? असल्यास केव्हापासून?

०३. संस्था / शासन / सेवाभावी संस्था यांचेकडून मिळालेले गौरव / पुरस्कार.

०४. आपले सेवाकालात आपलेकडून गैरवर्तन / आर्थिक गैरव्यवहार / नैतिक अध:पतन यासारख्या बाबी घडल्या आहेत का? याबाबत सस्थेकडून आपणास शिक्षा झाली आहे काय?

वरीलप्रमाणे माझ्याबद्दलची सादर केलेली माहिती माझ्या ज्ञानाप्रमाणे खरी आहे. तरी माझ्या अर्जाचा विचार करुन मला रयत शिक्षण संस्थेचे विभागीय अधिकारी करुन घ्यावे, ही विनती.

(सोबत मी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असल्याबद्दलचा एम.बी.बी.एस. / वैद्यकीय अधिका-यांचा दाखला जोडला आहे.)

स्थळ:

दिनांक:

आपला विश्वासू,

( )

टीप- वरील सर्व बाबीसंदर्भात योग्य ते पुरावे, प्रमाणपत्रे यांच्या छायांकित प्रती व वैद्यकीय दाखला जोडणे आवश्यक. कोणतीही माहिती खोटी आढळल्यास अर्ज बाद केला जाईल तसेच माहिती भरताना आवश्यक असलेल्या ठिकाणी सोबत स्वतंत्र कागद जोडावा.